स्टेशन डायरीतही याची नोंद करावी लागते. त्यानंतर ती एफआयआर गुन्हा ज्या हद्दीत घडला त्या पोलिस स्टेशनला पुढे पाठवावी लागते. ही एफआयआर कुठल्या पोलीस स्टेशनला पाठवण्यात आली आहे त्याची माहितीही पोलिसांनी तुम्हाला द्यावी लागते.

**तुम्ही एफआयआरमध्ये काय नोंदवले पाहिजे?**

* तुमचे नाव आणि पत्ता.
* तुम्ही ज्याबाबत माहिती देणार आहात ती घटना घडल्याची तारीख, वेळ आणि ठिकाण.
* ज्या क्रमाने घडली त्या क्रमाने घटनेतील सत्य गोष्टी. सोबतच गुन्ह्याच्या पद्धतीबाबतचे तपशील (उदाहरणार्थ- शारीरिक जखमा किंवा वापरलेली शस्त्रे)
* घटनेत सहभागी व्यक्तींची नावे आणि त्यांचे वर्णन. तुम्हाला आरोपींची नावे माहीत नसतील तर त्यांची ओळख पटण्यासाठी आवश्यक असलेले तपशील द्या. उदाहरणार्थ- वय,लिंग,शरीरयष्टी आणि उंची किंवा त्यांच्या शरीरावरील विशिष्ट खुणा किंवा बोलण्यातील विशिष्ट लकबी.

**तुम्ही टाळायला हव्यात अशा गोष्टी**

* खोटी तक्रार दाखल करणे किंवा पोलिसांना खोटी माहिती देणे. कायद्यानुसार तुम्हाला चुकीची माहिती दिल्याबद्दल किंवा पोलिसांची दिशाभूल केल्याबद्दल शिक्षा होऊ शकते. (भारतीय दंडसंहिता, कलम २०३)
* घडलेल्या गोष्टी जास्त रंगवून किंवा तोडून मोडून सांगणे
* अस्पष्ट किंवा नीट समजणार नाही अशी विधाने करणे

**एफआयआर दाखल करून घेतली जात नसेल तर काय करता येईल?**

* पोलीस अधीक्षक (एसपी) यांना किंवा इतर उच्चपदस्थ पोलिस अधिकाऱ्यांना भेटा. जसे की, विशेष पोलिस महानिरीक्षक किंवा पोलिस महानिरीक्षक यापैकी कुणाला तरी भेटून तुमची तक्रार निदर्शनाला आणून द्या.
* तुमची तक्रार संबंधित एसपीला पोस्टाने पाठवा. एसपी तुमच्या तक्रारीबाबत समाधानी असेल, तर तो/ती एक तर केसचा तपास करेल किंवा तपास केला जावा यासाठी आदेश देईल.
* कार्यक्षेत्रातील न्यायालयात वैयक्तिक तक्रार दाखल करा.
* तुमच्या राज्यातील मानवी हक्क आयोगाकडे तक्रार दाखल करा. तुमच्या राज्यात असा आयोग नसेल तर पोलिसांबाबतची तुमची तक्रार राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाकडे पाठवा.
* लैंगिक गुन्ह्यातली पीडित स्त्री असाल तर तुम्ही भारतीय दंडसंहितेतील कलम १६६ अ (क) अंतर्गत पोलिस अधिकाऱ्यावर एफआयआर दाखल करू शकता.

तुम्हाला हे माहीत असले पाहिजे, की तुम्ही एफआयआर दाखल केल्यानंतरही पोलीस तपास सुरू करण्यास नकार देऊ शकतात. पोलीस अधिकाऱ्याचा दृष्टिकोन खालीलपैकी कुठला असेल तर असे होऊ शकते १) हे प्रकरण गंभीर नाही. २) तपास करण्यासाठी पुरेसा बळकट आधार नाही.
असे असले तरी पोलिसांनी तपास न करण्यासाठीची पुरेशी कारणे दिली पाहिजेत. सोबतच तपास केला जाणार नसल्याचे लगोलग तुम्हाला सांगायलाही हवे. (कलम १५७, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३)

**सीपीआरआयविषयी.....**

कॉमनवेल्थ ह्युमन राइट्स इनिशिएटिव्ह ही एक आंतरराष्ट्रीय, स्वतंत्र, स्वयंसेवी, ना-नफा संस्था आहे. **सीपीआरआयचे** मुख्यालय भारतामध्ये आहे. प्रजासत्ताक देशांमध्ये मानवी हक्कांची जोपासना आणि जाणीव जागृती करणे हे या संस्थेचे काम आहे. मानवी हक्कांचे सतत आदर्श पद्धतीने पालन व्हावे यासाठी ही संस्था सतत प्रयत्न करते.

**आमचे उपक्रम**


- ॲक्सेस टू जस्टिस (पोलीस दलाबाबतच्या सुधारणा)
- ॲक्सेस टू जस्टिस (तुरुंग यंत्रणेबाबतच्या सुधारणा)
- ॲक्सेस टू इन्फर्मेशन
- इंटरनॅशनल ॲडव्होकसी ॲन्ड प्रोग्रामिंग


**कॉमनवेल्थ ह्युमन राईट्स इनिशिएटिव्ह**

सीपीआरआय CHRI मुख्यालय
तिसरा मजला, सिद्धार्थ चेंबर्स,
५५ ए, कालू सराय,
नवी दिल्ली- १०० ०१७ भारत,
दूरध्वनी : +९१-११-४३१८०२००
फॅक्स : +९१-११-४३१८-०२१७
ई-मेल : info@humanrightsinitiative.org
Website http:// www.humanrightsinitiative.org


# प्राथमिक माहिती अहवाल (एफआयआर)

## पोलीस आणि तुम्ही
### तुमचे अधिकार जाणा



CHRI
Commonwealth Human Rights Initiative

## प्राथमिक माहिती अहवाल (एफआयआर) म्हणजे काय?

प्राथमिक माहिती अहवाल (एफआयआर) हा पोलिसांनी तयार केलेला लिखित दस्तऐवज असतो. पोलिसांकडे जेव्हा दखलपात्र गुन्हा घडल्याची माहिती येते, तेव्हा हा दस्तऐवज तयार केला जातो. पोलिसांकडे घडलेल्या गुन्ह्याबाबत जी माहिती पहिल्यांदा पोचते त्याचा तो अहवाल असतो. म्हणूनच त्याला फर्स्ट इन्फर्मेशन रिपोर्ट (प्राथमिक माहिती अहवाल) असे म्हटले जाते.

पोलिस केवळ दखलपात्र गुन्ह्यांच्या संबंधाने एफआयआर नोंदवतात. दखलपात्र गुन्हे हे गंभीर गुन्हे असतात. यासाठी पोलीस वॉरंट नसतानाही संबंधिताला अटक करू शकतात. सोबतच पोलीस यात दंडाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय तपासही सुरू करू शकतात. नेहमी लक्षात ठेवा- प्राथमिक माहितीवरून जर गुन्हा दळलपात्र वाटत असेल तर पोलिसांनी एफआयआर दाखल केलीच पाहिजे.

## प्राथमिक माहिती अहवाल (एफआयआर) महत्त्वाचा का?

एफआयआरच्या माध्यमातून फौजदारी न्यायाची प्रक्रिया सुरू होते. प्रक्रियात्मक कायद्यानुसार,एफआयआर दाखल केल्यानंतरच पोलीस एखाद्या प्रकरणात तपास सुरू करू शकतात. याशिवाय, प्रकरण कोर्टात गेल्यास न्यायनिवाड्यादरम्यान एफआयआर पहिली आणि विचारात घेतली जाते. त्यामुळे संबंधित प्रकरणातला तक्रारदार किंवा माहिती देणारा यांना माहीत असलेली गरजेची तथ्ये एफआयआरमध्ये नीटपणे नोंदवली जाणे गरजेचे असते.

हे कायद्यानुसार स्पष्ट आहे की, प्राथमिक माहितीतून दखलपात्र गुन्हा घडल्याचे समोर येते, तेव्हा एफआयआर दाखल करणे बंधनकारक आहे.

अशा वेळी पोलीस म्हणू शकत नाहीत, की एफआयआर दाखल करण्याआधी आम्हाला प्राथमिक माहितीचा तपास करायचा आहे. (अर्थात याला खूप मोजक्या गुन्ह्यांबाबत सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेले अपवाद आहेत.) प्राप्त प्राथमिक माहितीतून हा गुन्हा दखलपात्र आहे की अदखलपात्र हे नीटपणे समजत नसेल तरच पोलिस प्राथमिक तपास करू शकतात. अर्थात हे प्रत्येक केसनुसार ठरते. हा प्राथमिक तपाससुद्धा घडलेला गुन्हा दखलपात्र आहे किंवा नाही हे शोधण्यासाठीच केला जातो. प्राप्त प्राथमिक माहितीची पडताळणी करण्यासाठी तो करता येत नाही. हा तपास ७ दिवसांतच पूर्ण झाला पाहिजे. (सर्वोच्च न्यायालयाचा निकाल- ललिता कुमारी विरुद्ध उत्तर प्रदेश सरकार आणि इतर)

## एफआयआर कोण नोंदवू शकते?

दळलपात्र गुन्हा घडल्याची माहिती ज्याला आहे तो कुणीही पोलीस स्टेशनला जाऊन एफआयआर नोंदवू शकतो. पीडित व्यक्ती, गुन्ह्याची साक्षीदार असलेली व्यक्ती किंवा गुन्हा घडलाय अशी माहिती ज्याला आहे ती व्यक्ती. एखादा पोलीस अधिकारी ज्याला दखलपात्र गुन्हा घडल्याचे समजले आहे तो किंवा ती स्वतः एफआयआर दाखल करू शकतो/शकते.

## तुम्ही एफआयआर नोंदवू शकता जर

* ज्याच्याबाबत गुन्हा घडला आहे, ती व्यक्ती तुम्ही आहात
* तुम्हाला घडलेल्या गुन्ह्याची माहिती आहे.
* तुम्ही गुन्हा घडताना पाहिला आहे.

## एफआयआर नोंदविण्याची प्रक्रिया काय आहे?

१९७३ सालच्या फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ मध्ये सांगितलेल्या प्रक्रियेनुसार एफआयआर नोंदवली जाते. प्रत्येक वेळी एफआयआर नोंदवून घेताना पोलिसांनी ही प्रक्रिया अवलंबायला हवी. एफआयआर ही पोलिसांना लेखी स्वरूपात देता येते किंवा ती तोंडी सांगितली तरी चालते.

* एफआयआरसाठी तुम्हाला माहिती तोंडी द्यायची असेल, तर पोलिसांनी तुम्हाला सगळी गोष्ट सांगायला लावली पाहिजे. जेणेकरून तुम्ही सांगत असलेल्या त्या शब्दांच्या अगदी जवळपास जाणाऱ्या शब्दांत ती माहिती कोऱ्या कागदावर पोलिसांना उतरवून काढता येईल.
* तुम्ही ही माहिती पोलिसांना सांगितल्यावर त्यांनी जे लिहून घेतले आहे ते तुम्हाला वाचून दाखवले पाहिजे. माहिती देणारी किंवा तक्रार करणारी व्यक्ती म्हणून हा तुमचा हक्क आहे.
* एकदा का एफआयआर पूर्ण तयार झाली, की माहिती देणाऱ्या व्यक्तीची त्यावर सही घ्यायला हवी. तुम्ही सांगितलेली माहिती पोलिसांनी अचूकपणे नोंदवली/लिहिली आहे, याची तुम्हाला खात्री पटते तेव्हाच तुम्ही सही केली पाहिजे.
* ज्यांना लिहिता-वाचता येत नाही अशा व्यक्तींनी एफआयआर अचूक असल्याची खात्री पटताच तिच्यावर डावा अंगठा उमटवावा.
* या एफआयआरची प्रत तत्काळ आणि नि:शुल्क मिळणं हा तुमचा हक्क आहे. पोलिसांनी एफआयआरची कॉपी दिली नाही तर ती तुम्ही मागून घ्या.
* पोलिसांनी पोलीस स्टेशनच्या डायरीत एफआयआरची तारीख आणि संदर्भ नोंदवून ठेवले पाहिजेत.

## लिंगाधारित अत्याचारांना बळी पडलेल्या स्त्रियांसाठी विशेष प्रक्रिया

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ (१) मध्ये विशिष्ट लिंगाधारित लैंगिक गुन्ह्याबाबत माहिती देण्यात आली आहे. या गुन्ह्यांसाठी एफआयआर नोंदविण्याची पद्धतही त्यात दिलेली आहे. पीडित व्यक्ती स्वतःहून एफआयआर नोंदवायला आली तर तिची एफआयआर महिला पोलिसानेच नोंदवून घेतली पाहिजे. पीडित व्यक्ती मानसिक किंवा शारीरिकदृष्ट्या असंतुलित असेल (काही काळापुरतीही) तर एफआयआर तिच्या घरी किंवा तिने निवडलेल्या जागी जाऊन नोंदवली पाहिजे. इथे दुभाषी किंवा खास शिक्षक उपस्थित असला पाहिजे आणि सगळ्या संवादाचं व्हिडिओ चित्रीकरण झाले पाहिजे.

**सीआरपीसीच्या कलम १५४ (१) मध्ये नोंदवलेल्या गुन्ह्यांची एफआयआर नोंदवून घेण्यास पोलिसांनी नकार दिला तर तो दंडनीय अपराध ठरतो. संबंधित पोलिस अधिकारी व्यक्ती सहा महिन्यांच्या तुरुंगवासास पात्र ठरते. हा तुरुंगवास दोन वर्षांपर्यंत वाढूसुद्धा शकतो. त्या संबंधित अधिकाऱ्यांना दंडही आकारला जाऊ शकतो. (भारतीय दंडसंहिता, कलम १६६ अ (क))**

## झीरो एफआयआर

एखादा गुन्हा किंवा गुन्हे घडल्याची माहिती दिली जात असल्यास कुठलाही पोलीस अधिकारी एफआयआर नोंदवून घेण्यास नकार देऊ शकत नाही. हे गुन्हे संबंधित पोलिस स्थानकाच्या हद्दीबाहेर घडलेले असले तरीही एफआयआर नोंदवून घ्यावी लागते.(अशावेळी याला झीरो एफआयआर असे संबोधले जाते.) सोबतच त्या पोलीस अधिकाऱ्याला